# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**धुळे महापालिकेमार्फत लख प्रकाशासाठी ३५ चौकांमध्ये महागडे २४ हायमास्ट बसविण्याबाबत**

**(१) ५८२३ (०७-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महापालिकेमार्फत लख्ख प्रकाशासाठी ३५ चौकांमध्ये महागडे २४ हायमास्ट बसविण्यात आले असून त्याच्यासाठी विजेचा खर्च अडीच कोटीच्या घरात जात असून देखभालीचा वार्षिक खर्च ६५ लाखांवर जात आहे, ही वीज बील भरणे पालिकेला अडचणीचे व खर्चीक ठरत असून वीज बचतीच्या दृष्टीने एल ई डी दिव्यांचा प्रस्ताव धूळ खात पडलेला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज बचतीच्या दृष्टीने महत्वपूर्ण असा एल.ई.डी दिव्याचा प्रस्ताव मंजूर करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) व (२) धुळे महानगरपालिका क्षेत्रात एकूण १२८४० पथदिवे आहेत. या पथदिव्यांपैकी १६ मिटर उंचीचे ५० हायमास्ट आहेत. एकत्रित पथदिव्यांचे विजबील खर्चापैकी निव्वळ हायस्माट पथदिव्यांचे विजबिल वार्षिक खर्च सुमारे २२.२५ लक्ष आहे. धुळे क्षेत्रातील एकत्रित संपूर्ण दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा खर्च ६५ लक्ष वार्षिक आहे. धुळे महानगरपालिका आर्थिक उत्पन्न व खर्च याबाबत सद्यस्थितीत ताळमेळ नसल्याने, मागील ३ ते ४ महिन्यापासून शहरातील एकत्रित पथदिव्यांचे बिल भरणे प्रलंबीत आहे.

सन २०१३ मध्ये महानगरपालिका स्थायी समितीकडून धुळे शहरात बी.ओ.टी. तत्वावर एलईडी पथदिवे बसविण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे. तथापि अशा स्वरुपाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने तांत्रिक बाबी, आर्थिक बाबी व बचतीबाबत तपासणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. तसेच, एलईडी पथदिव्यांची उपयोगिता व आयुष्यमान तपासणीसाठी प्रायोगिक तत्वावर काही नामांकित एलईडी उत्पादक कंपनीकडून फ्री डेमोस्ट्रेशन घेण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्हा रुग्णालयात औषधांचा तुटवडा असल्याबाबत

**(२) ५८३० (०६-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा रुग्णालयात धुळे, नाशिक, जळगाव, नंदुरबार आणि मध्यप्रदेशातील आलेल्या रुग्णांना रुग्णालयात औषधांचा प्रचंड तुटवडा असल्याने या रुग्णांना बाहेरुन महागडी व न परवडणारी औषधे विकत आणावी लागत आहे असे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास धुळे जिल्हा रुग्णालयात आवश्यक औषधांचा पुरेसा पुरवठा करण्याच्या दृष्टीने शासन काही उपाययोजना करणार आहे काय,

(३) असल्यास त्याचा तपशिल काय,

(४) नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (१७-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नदीजोड प्रकल्पाबाबत

**(३) ५८३५ (०८-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नदीजोड प्रकल्प हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून जाहिर झालेला असून राज्य शासन या प्रकल्पाचे संकल्प चित्र लवकरच पूर्ण करणार आहे, सदर प्रकल्पात महाराष्ट्र राज्याला काही अतिरिक्त पाणी मिळणार नसून केवळ हद्दीतील हक्काचा वाटाचा मिळणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्यास या प्रकल्पाद्वारे अतिरिक्त पाणी मिळण्याच्या दृष्टीने शासन काही प्रयत्न करणार असल्यास त्याचा तपशील काय,

(३) तसेच, या नदीजोड प्रकल्पाद्वारे खान्देशात अतिरिक्त पाणी मिळणार आहे काय,

(४) असल्यास, त्याचा तपशील काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :**(१) होय, सर्वसाधारणपणे पाणलोट क्षेत्राचे प्रमाणात पाणी वाटप करण्याचे धोरण आहे.

राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांचे मार्फत National Perspective Plan मध्ये ३० मोठ्या नदीजोड योजनांचा समावेश असून त्यातील Peninsular Link मध्ये दमणगंगा-पिंजाळ आणि पार-तापी-नर्मदा या महाराष्ट्राशी निगडीत दोन आंतरराज्य नदी जोड प्रकल्पांचा समावेश आहे.

दमणगंगा-पिजांळ नदी जोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरण (NWDA) यांच्याकडून तयार करण्यात आलेला आहे. तथापि, पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पांचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरण (NWDA) यांच्याकडून अद्यापि तयार झालेला नाही.

(२) दमणगंगा-पिजांळ आणि पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पांसर्दभात गुजरात व महाराष्ट्र यामधील पाणी वाटपाचा कोणताही करार करण्यात आलेला नाही हा करार करताना राज्याचे हित जपले जाईल.

(३) नार, पार, अंबिका, औरंगा नदीखो-यातील सर्वसाधारणपणे २०० मी. उपसा उंचीच्या मर्यादेत उपलब्ध होणारे पाणी गिरणा खोऱ्यात नार-पार-गिरणा नदी जोड योजनाद्वारे वळविणे विचाराधीन आहे.

(४) नार, पार, औरंगा, अंबिका या ४ खोऱ्यातील पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी पुर्वेकडे तापी खोऱ्यात वळविण्यासाठी योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागणाऱ्या खर्चास दिनांक २३.१२.२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

## संपूर्ण राज्यात अनुसूचित जातीचे नोकर भरती व अन्य प्रकारचे आरक्षण साधारणतः १३ टक्के निश्चित केल्याबाबत

**(४) ५८३६ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जातीचे नोकर भरती व अन्य प्रकारचे आरक्षण साधारणतः १३ टक्के निश्चित केले गेले आहे. परंतु धुळे जिल्ह्यासाठी हे प्रमाण ८ टक्के निश्चित करण्यात आले आहे. सन १९९७-९८ मध्ये धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन धुळे व नंदूरबार असे जिल्हे झाले असून लोकसंख्येच्या प्रमाणात धुळे जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आलेले उक्त प्रमाण अन्यायकारक असून ते १३ टक्क्यापर्यंत वाढवावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, असे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१५) :**(१) व (२) अद्याप सामान्य प्रशासन विभागास निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि याबाबतची वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे.

आरक्षण अधिनियम-२००१ नुसार अनुसूचित जातीसाठी १३ टक्के व अनुसूचित जमाती साठी ७ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

आदिवासी जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये दिनांक ६ जून, १९७२ च्या शासन निर्णयान्वये गट-क व गट-ड मधील सरळसेवांमध्ये वाढीव आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यानुसार पुर्वीच्या धुळे जिल्ह्यासाठी २२ टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते.

महसूल व वन विभागाच्या दिनांक ३०.६.१९९८ च्या अधिसूचनेन्वये पूर्वीच्या धुळे जिल्ह्याचे विभाजन करुन धुळे व नंदूरबार असे दोन जिल्हे निर्माण करण्यात आलेले त्यानुसार दिनांक २२ सप्टेंबर, १९९९ च्या शासन निर्णयान्वये धुळे जिल्ह्यासाठी पूर्वी प्रमाणे अनुसूचति जमातीसाठी २२ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. अनुसूचित जमातीसाठी दिलेले वाढीव आरक्षण एकूण ५२ टक्के आरक्षणाच्या मर्यादेत आहे.

धुळे जिल्ह्यात अनुसूचित जमातीसाठी विहीत लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाच्या टक्केवारीपेक्षा वाढीव आरक्षण मंजूर केल्यामुळे अनूसूचति जातीचे आरक्षण कमी करुन ८ टक्के एवढे करण्यात आले आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार धुळे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २०,५०,८६२ एवढी आहे. त्यापैकी आदिवासींची लोकसंख्यं ६,४७,३१५ एवढीआहे. सदर आकडेवारी नुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ३१.५६ टक्के एवढे आहे. तसेच अनुसूचित जातीची लोकसंख्या १.२७,५१७ एवढी असून जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ६.२२ ऐवढी असून जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ६.२२ टक्के एवडी आहे. मात्र धुळे जिल्ह्याकरिता अनुसूचित जाती प्रवर्गास गट-क व गट-ड मधील सरळसेवांमध्ये ८ टक्के एवढे आरक्षण ठेवण्यात आले आहे. यावरुन लोकसंख्येचा प्रमाणानुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी देण्यात अलेले आरक्षण हे पुरेसे आहे हे स्पष्ट होते ही वस्तुस्थिती विचारात घेता अनुसूचित जातीसाठी विहित करण्यात आलेले ८ टक्के आरक्षण अन्यायकारक आहे ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे तालुक्यातील क- वर्ग तीर्थक्षेत्राबाबत

**(५) ५८३८ (०८-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील क- वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून घोषित झालेल्या नाणे, बेहेड, खंडलाय बु.काळखेडा, कावठी, दहयाणे, तरवाडे, जापी, विशवनाथ, मुकटी या दहा तीर्थ क्षेत्रांना प्रत्येकी पाच पाच लाखांचा उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी तेथे येणा-या लाखो भाविकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अपूरा असून आणखी निधीची आवश्यकता असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासाठी काही भरीव आर्थिक मदत करण्याचे योजले आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) (२) व (३) हे खरे नाही.

धुळे जिल्यातील क-वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून घोषित झालेल्या नाणे, बेहेड, खंडलाय बु.काळखेडा, कावठी, दहयाणे, तरवाडे, जापी, विश्वनाथ, मुकटी या दहा तीर्थक्षेत्रांना प्रत्येकी रु.५.०० लाखांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे व सदर कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

सदर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकासांठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व त्यासाठी किती निधी आवश्यक आहे याचा आढावा घेऊन प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी अनेक रुग्णालय कार्यवाही करीत नसल्याबाबत

**(६) ५८४० (०८-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेचा फायदा सर्व सामान्य जनतेला मिळत नसून अनेक रुग्णालय या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कार्यवाही करत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत मान्य झालेल्या हॉस्पीटलला ऑनलाईन माहिती देण्याचे बंधन घालण्यासंदर्भात राज्य शासन कार्यवाही करणार आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत पात्र असणा-या रुग्णास संबंधीत हॉस्पीटलने नकार दिल्यास राज्य शासन त्यावर कोणती कारवाई करणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबतचे शासनाचे निश्चित धोरण काय ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :**(१) नाही. योजनेतंर्गत समाविष्ट रुग्णालयांचे आतापर्यंत ४,९३,४१५ एवढे प्रिऑथराझेशन मंजुर करण्यात आले असुन त्यापैकी ४,८४,०८२ एवढ्या रुग्णांवर उपचार/शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

(२) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसंदर्भातील सर्व कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने करण्यात येते.

(३) व (४) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट एखाद्या रुग्णालयाने उपचार करण्यास नकार दिल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर रुग्णालयास टीपीए मार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येते. सदर नोटीसीला समाधानकारक उत्तर न मिळाल्यास रुग्णालयास निलंबित करण्यात येते. तरीही रुग्णालयाने रुग्णांच्या तक्रारीचे निराकरण न केल्यास रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्यात येते.

---

**दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडोर प्रकल्प पाणी व अन्य तांत्रिक कारणामुळे अन्यत्र स्थलांतरीत करण्यात येणार असल्याबाबत**

**(७) ५८४१ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील परिसर विकास होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेला दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडोर प्रकल्प पाणी व अन्य तांत्रिक कारणामुळे अन्यत्र स्थलांतरीत करण्यात येणार असल्याचे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातील धुळे परिसरातील पाण्याच्या अडचणीवर यशस्वी तोडगा शोधून काढण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर प्रकल्पातंर्गत धुळे जिल्हयातील औद्योगिक क्षेत्रासाठी निम्न तापी प्रकल्प पाडळसे, ता.अंमळनेर, जि.जळगांव या प्रकल्पातून ७०.३६ दलघमी पाण्याचे आरक्षण पाटबंधारे विभागाने मंजूर केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील अनुदानित आश्रमशाळा कर्मचा-यांना थकीत असलेले वेतन मिळवून देण्याबाबत**

**(८) ५८४३ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील अनुदानित आश्रमशाळा कर्मचा-यांना त्यांचे माहे सप्टेंबर, २०१४ पासून थकीत असलेले वेतन मिळवून देण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी समाजकल्याण कार्यालयावर मोर्चा नेऊन घंटानाद आंदोलनाबाबतचे निवेदन विमुक्त जाती भटक्या जमाती अनुदानित आश्रमशाळा कर्मचारी संघटनेतर्फे सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण विभाग) यांच्याकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :**(१) होय.

(२) धुळे जिल्हयातील २३ विजाभज आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांचे माहे फेब्रुवारी, २०१५ पर्यंत नियमित वेतन अदा केलेले आहे व त्यांचे मार्च, २०१५ पासूनचे वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे येथे भरती करण्यात आलेल्या विस्तार अधिकारी यांना तांत्रिक खंडानंतर सेवाकालावधी पुढे न वाढविल्याबाबत**

**(९) ५८५१ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकाराची अंमलबजावणी होण्यासाठी विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख (अभावित) ही पदे भरण्यात आलेली असून शासन निर्णयानुसार सदर पदे भरताना ११ महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती देण्यात येवून एका दिवसाच्या तांत्रिक खंडानंतर पुन्हा तेवढयाच कालावधीकरीता नियुक्ती देण्यात येते, परंतु धुळे जिल्हयात सदर पदांवर नियुक्ती देण्यात आलेल्या ३८ उमेदवारांना केवळ ६ महिन्यांकरीता नियुक्ती देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती कायम पुढे सुरु ठेवण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :**(१) होय,

विस्तार अधिकारी (शिक्षण) संवर्गातील रिक्त पदे अभावितपणे भरण्यात आलेली नाहीत. केंद्र प्रमुखाची रिक्त पदे ६ महिन्याकरता अभावितपणे भरण्यात आली आहेत.

(२) व (३) केंद्र प्रमुख संवर्गातील रिक्त पदाकरीता नियमित उमेदवार उपलब्श होईपर्यत सदर पदे अभावितपणे अकरा-अकरा महिन्याकरिता भरण्यास शासन पत्र क्रमांक पदनि२०१५/ प्र.क्र.६/आस्था१०, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना परवानगी दिली आहे.

---

**जळगाव-भुसावळ शहरातील रुग्णालये, पॅथॉलॉजी लॅब क्लिनीक आणि जनरल प्रॅक्टीस करणारे डॉक्टर वैद्यकीय जैविक घनकचरा थेट रस्त्यावर किंवा अन्य ठिकाणी टाकत असल्याबाबतची तक्रार**

**(१०) ५८५३ (०६-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव-भुसावळ शहरातील सुमारे साडेतीनशेपेक्षा अधिक रुग्णालये, पॅथॉलॉजी लॅब क्लिनीक आणि जनरल प्रॅक्टस करणारे डॉक्टर रुग्णांवर उपचार केल्यानंतर वैद्यकीय जैविक घनकचरा थेट रस्त्यावर किंवा अन्य ठिकाणी टाकत असल्याची तक्रार मन्साई बायोमेडीकल वेस्ट प्रकल्पाच्या संचालकांनी दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (३०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाअंतर्गत अंतर जिल्हा बदलीसाठी एक हजार शिक्षक प्रतिक्षा यादीत असल्याबाबत**

**(११) ५८५६ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाअंतर्गत अंतर जिल्हा बदलीसाठी एक हजार शिक्षक प्रतिक्षा यादीत असून या कामासाठी नेमलेली समिती अद्याप अहवाल पूर्ण न करु शकल्याचे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ही बदली प्रक्रिया लवकरात लवकर करण्याच्या दृष्टिने काही पावले उचलली आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :**(१) नाही, धुळे जिल्हा परिषदेने आदेश क्र.साप्रवि/आस्था-१/०३/२०१५, दिनांक ६-१-२०१५ च्या आदेशान्वये आंतर जिल्हा बदलीने प्रस्ताव पडताळणी कामी तीन कर्मचाऱ्यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. संबंधित कर्मचाऱ्यांनी आंतरजिल्हा बदलीचे सर्व प्रस्तावांची पडताळणी करुन दिनांक २१-१-२०१५ अन्वये अहवाल सादर केला आहे.

(२), (३) व (४) आंतरजिल्हा बदलीची प्रक्रिया लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने नेमलेल्या समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन, त्रुटींची पूर्तता करुन तात्पुरती प्रारुप यादी प्रसिध्द केली व तदनंतर हरकती व सूचना प्राप्त करुन अंतिम यादी दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी धुळे जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर व धुळे एनआयटी च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.

पती पत्नी एकत्रिकरण अंतर्गत प्राप्त प्रस्तावामध्ये ज्या कर्मचाऱ्यांनी पती पत्नी सेवेत असल्याबाबत सबळ पुरावा सादर करु न शकलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक ३० एप्रिल, २०१५ पर्यंत नियुक्तीबाबत ठरावाची प्रत, नियुक्ती आदेश व सहा महिन्याचा वेतनाचा दाखला सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार दिनांक ३० एप्रिल, २०१५ पर्यंत पती पत्नी एकत्रिकरण अंतर्गत प्राप्त झालेले सबळ पुराव्यानुसार अंतिम यादीत नमूद करण्यात येऊन प्रवर्गनिहाय, प्राधान्यक्रमानुसार आंतरजिल्हा बदलीची यादी तयार करण्यात आली असून आंतरजिल्हा बदलीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

मात्र, मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या ९०२६/२०१४ प्रकरणी मा.न्यायाधिकरणाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने ग्राम विकास व जल संधारण पत्र क्र. जिपब ४८१५/(प्र.क्र.१२२/२०१५)/आस्था १४, दि. १८ मे, २०१५ नुसार आपसी बदली व्यतिरिक्त आंतरजिल्हा बदलीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे.

---

**धुळे येथील हजारखोली परिसरातील तरिकोद्दीन सद्दोदीन काझी**
**यांची एका तोतया बँक अधिका-याने फसवणूक केल्याबाबत**

**(१२) ५८५८ (०८-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील हजारखोली परिसरातील तरिकोद्दीन सद्दोदीन काझी यांची एका तोतया बँक अधिका-याने फसवणूक करुन त्यांच्या बँक खात्यातून १ लाख २ हजार ४५० रुपयाची रोकड परस्पर एटीएमव्दारे काढण्यात आली आहे याप्रकरणी धुळे पोलीस स्टेशनमध्ये फसवणूकीचा गुन्हा दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्तप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :**(१) बँकचे अधिकारी असल्याचे खोटे सांगून प्रश्नात नमूद श्री.काझी व त्यांची मुलगी यांचे बँक खात्याची व एटीएम कार्डची माहिती घेवून आरोपीने १,०२,३५०/- रुपयाची ऑनलाईन खरेदी करुन फसवणूक केल्याबाबत धुळे शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७/२०१५ भा.दं.वि. कलम ४२० व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(सी) अन्वये दि.१७/०१/२०१५ रोजी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल आहे.

(२) होय, गुन्ह्याचा तपासात प्रश्नात नमूद श्री.काझी व त्यांच्या मुलीच्या यांचे बँक खात्यातून एकूण १,०२,३५०/- रुपयाची ऑनलाईन खरेदी केलयाचे निष्पन्न झाले आहे. त्याबाबत संबंधित बँकेकडे व्यक्तीश: व पत्रव्यवहार केला असून फिर्यादी व त्यांच्या मुलीच्या खात्यात एकूण रु.१९,७१४ जमा झाल्याचे आढळून आले. गुन्ह्यातील आरोपीच्या मोबाईल क्रमांकाबाबत शोध घेणे सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**धुळे जिल्ह्यातील शेवगे ग्रामपंचातीच्या विकासासाठी आलेल्या तेराव्या वित्त आयोग व ग्रामनिधीतील अपहाराबाबत**

**(१३) ५८६५ (०८-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील शेवगे ग्रामपंचातीच्या विकासासाठी आलेल्या तेराव्या वित्त आयोग व ग्रामनिधी च्या सुमारे २६ लाख ६३ हजार इतक्या रक्कमेचा अपहार झालेला असून अद्याप आरोपींवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही असे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या संबंधित विभागाने याप्रकरणी काही कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :**(१), (२) व (३) धुळे जिल्ह्यातील शेवगे ग्रामपंचायतीच्या विकासासाठी आलेल्या तेराव्या वित्त आयोग वग्रामनिधीच्या सुमारे २६ लाख ६३ हजार रकमेचा अपहार झाल्याबाबत सरपंच श्रीमती सुनंदा बाळू चोरे, ग्रा.पं. शेवगे यांनी दिनांक २६.११.२०१४ रोजी केलेल्या तक्रारीस अनुसरुन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प.धुळे यांनी चौकशी करुन दिनांक ३०.१२.२०१४ अन्वये अहवाला सदर केला आहे. त्यानुसार रक्कम रु.३८.१८.०८०/- या रकमेचा संशयित अपहारा प्रकरणी संबंधित ग्रामसेवक श्री. एस.एन.भामरे यांना आदेश दिनांक ०९.०१.२०१५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती साखरी यांनी श्री.एस.एन भामरे पंचायत समिती साखरी यांनी श्री.एस.एन.भामरे निलंबित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शेवगे यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा FIR No १५/२०१५ दिनांक २५.०२.२०१५ अन्वये पिंपळनेर ता.साक्री, जि.धुळे पोलीस ठाणे येथे नोंदविलेला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**धुळे येथील महापालिका कर्मचाऱ्यांना गेल्या तीन महिन्याचे वेतन न मिळाल्याबाबत**

**(१४) ५८६६ (३०-०६-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील महापालिका कर्मचाऱ्यांना गेल्या तीन महिन्याचे वेतन न मिळाल्याने संतप्त कर्मचाऱ्यांनी दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी आंदोलन करुन न्याय देण्याबाबत मनपा आयुक्तांकडे तसेच जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०४-२०१५) :**(१) धुळे महानगरपालिका कर्मचारी समन्वय समितीने अशा प्रकारचे निवेदन जिल्हाधिकारी, धुळे यांना दिले आहे.

(२), (३) व (४) धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने, वेतन देण्यास विलंब झाला आहे. तथापि महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचा-यांचे फेब्रुवारी, २०१५ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले असून, त्यापुढील वेतन व इतर रकमा महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील राखीव पोलीस दलातील बदल्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत**

**(१५) ५८७२ (०६-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राखीव पोलीस दलातील कर्मचारी १० वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर जिल्हा पोलीस दलात बदलून जाण्यास पात्र असतात यासाठी जिल्हा पोलीस दलात त्यांच्यासाठी १० टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात तरी देखील सदर कर्मचा-यांच्या बदल्या करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे माहे जानेवारी २०१५ वा त्या दरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१), (२), (३) व (४) नाही.

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा.मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या पोलीस कर्मचारी संवर्गात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्ठीने बंदोबस्तासाठी मागणीनुसार पोलीस कर्मचारी पाठविणे अडचणीचे होत आहे. सदरबाब लक्षात घेऊन संबंधीत कार्यालयाने दि.३.५.२०१४ नुसार सन २०१४ या एक वर्षासाठी जिल्हा बदल्या न करण्याचा निर्णय घेतला.

मात्र या विरोधात मा.प्रशासकीय न्यायाधिकरण येथे मुळ अर्ज क्र.४४६/१४ दाखल करण्यात येऊन त्यावर दि.९.७.२०१४ अन्वये मा.न्यायाधिकरणाने काही प्रमाणात बदल्या कराव्यात असे निर्देश दिले. यासंदर्भात शासनाने उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १०४९२/१४ दाखल केली. मा.उच्च न्यायालयाने दि. २३.२.२०१५ रोजी झालेल्या सुनावणीस, अपपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल यांना दोन आठवड्यात बदल्या करण्याचे निर्देश दिल्याने राज्य राखीव पोलीस बलातील एकूण १००६ पोलीस कर्मचाऱ्यांची जिल्हा बदली करण्यात आली आहे.

---

**धनुर (ता.जि.धुळे) येथील कापडणे शिवारातील आदिवासी लार्भार्थ्यांसाठी घरकुल बांधण्याबाबत**

**(१६) ५८७६ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील धनुर (ता.धुळे) येथील कापडणे शिवारातील सुमारे ११ हेक्टर जागेवर सुमारे १३७ आदिवासी लार्भार्थ्यांसाठी घरकुल बांधण्याचे काम मंजूर झालेले असून सदर जागेवर गावातील काही ग्रामस्थांनी अतिक्रमण केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी काय कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) होय.

(२) सदर ग्रामपंचायती अंतर्गत ग्रामस्थाना अतिक्रमण काढून टाकण्यासाठी वेळोवेळी नोटीसा देण्यात आल्या आहेत. तथापि, नोटीशांना हस्तपोहच न दिल्याने त्यांना रजिस्टर पोस्टाने नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. ग्रामस्थांनाकडून अतिक्रमणे काढण्यासाठी प्रतिसाद मिळत नाही.

(३) सदरची अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामपंचायत कापडणे यांनी पोलीस संरक्षणाची वेळोवेळी मागणी केली आहे. परंतु अतिक्रमणे हटविण्यासाठी पोलीस संरक्षण उपलब्ध न झाल्याने विलंब होत आहे. तथापि, अतिक्रमणे हटविण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

---

**धुळे जिल्हयातील मागासवर्गीय मुलामुलींच्या वसतीगृहाच्या जागेसाठी मान्यता दिल्याबाबत**

**(१७) ५८७८ (१०-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी विशेष समाजकल्याण अंतर्गत सन २००७ पासून मागासवर्गीय मुलामुलींच्या वसतीगृहाच्या जागेसाठी मान्यता दिली होती, त्या जागेवर आजतागायत वसतीगृहाचे बांधकाम सुरु झालेले नसून त्याजागेवर बेकायदेशीररित्या पोलीस बल गट क्र. ६ ने तंबू ठोकून कब्जा केलेला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी मुलामुंलीच्या वसतीगृहाच्या बांधकामासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :**(१) होय.

(२) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने वसतीगृहासाठी पर्यायी जागा प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर आणि गडचिरोली या दोन जिल्हयांमधील महाविद्यालयात मराठी विभाग नसल्याबाबत**

**(१८) ५९०३ (०८-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर आणि गडचिरोली या दोन जिल्हयांमधील महाविद्यालये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर या विद्यापीठाच्या कक्षेत येत असून तीन वर्षानंतरही गोंडवाना या विद्यापीठाकडे मराठी विभाग नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१५-२०१६ या वर्षासाठी एम.ए.मराठी विभाग सुरु करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**मुंबई ते आजिवली-मुंबई ही एस.टी.पुन्हा पूर्ववत चालू करण्याबाबत**

**(१९) ५९१५ (०४-०४-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते आजिवली-मुंबई (जि.रत्नागिरी, ता.राजापूर) ही बाराही महिने भरगच्च भरलेली एस.टी.गेली ५० वर्षे फायद्यात असताना अचानक बंद करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील एस.टी.बंद करण्याचा हेतू काय आहे,

(३) मुंबई ते आजिवली-मुंबई ही एस.टी.पुन्हा पूर्ववत चालू करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१५) :**(१) व (२) आजिवली-परळ या फेरीला अत्यल्प भारमान मिळत असल्याने सदर फेरी बंद करण्यत आलेली आहे.

(३) आजिवली-परळ फेरीला कमी भारमान मिळत असल्याने फेरीच्या मार्गात बदल करुन मे, २०१४ पासून आजिवली-बोरीवली अशी सुरु केली, परंतु, या फेरीलाही कमी भारमान मिळून लागल्याने एप्रिल, २००५ पासून फक्त गर्दीच्या हंगामात सदर फेरी चालविण्यात येत आहे. तसेच या भागातील महत्वाचे ठिकाण असलेल्या व आजिवली पासून २७ कि.मी. अंतरावर असणाऱ्या पाचल येथून १६.०० वा.ची बोरीवली-पाचल अशी फेरी उन्हाळी हंगामात सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे अन्न व औषध प्रशासनाची अत्याधुनिक प्रयोगशाळा तसेच एफडीए भवन उभारण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(२०) ५९२३ (०६-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे अन्न व औषध प्रशासनाची अत्याधुनिक प्रयोगशाळा तसेच एफडीए भवन उभारण्याचा दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास शासनाने निर्णय घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रयोगशाळेसाठी जिल्हा प्रशासनाने मुंगसरे येथील गट नं १६६ ही दोन एकर जागा अन्न व औषध प्रशासन विभागाला हस्तांतरीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रयोगशाळेचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१७-०६-२०१५) :**(१) नाही.

तथापि, नाशिक येथे अन्न चाचणी प्रयोगशाळा स्थापित करण्याची बाब विचाराधीन आहे.

(२) होय.

(३) सदर बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अन्न व औषध प्रशासन विभागातील गैरव्यवहारांबाबत चौकशी करण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत**

**(२१) ५९३२ (०६-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासन विभागातील गैरव्यवहारांबाबत चौकशी करण्यासाठी सदर विभागाच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने दिनांक १७ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवालातील सर्वसाधारण शिफारशी काय आहेत,

(३) तसेच सदर चौकशी अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१६-०६-२०१५) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) दै.लोकमत चौकशी अहवालात पुढीलप्रमाणे शिफारशी करण्यात आल्या आहेत-

१. दै.लोकमत मध्ये प्रसिध्द वृत्तांच्या अनुषंगे कार्यवाहीचा आढावा घेणे.
२. अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणा-या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत.
३. लेंटीन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगे कार्यवाही.
४. अधिनियम/अनुज्ञाप्ती मधील उल्लंघनासंदर्भातील अपिलांची प्रकरणे विहित कालावधी निश्चित करुन निकाली काढणे.
५. मनुष्यबळ व सोयीसुविधांमध्ये वाढ करणे.
६. स्पर्धा परिक्षेद्वारा पदभरती करणे.
७. कार्यालयांचे विक्रेंद्रीकरण करणे.
८. गुप्त खब-यांना दयावयाच्या मोबदल्याबाबत नियमावली करणे.
९. स्वतंत्र दक्षता विभाग स्थापन करणे.
१०. विधी अधिका-यांचे स्वतंत्र पॅनेल स्थापन करणे.
११. राज्यातील सर्व प्रयोगशाळा एकाच अंमलाखाली आणणे.
१२. स्वयंपूर्ण प्रशिक्षण संस्था स्थापन करणे.

१३. अतिरिक्त आयुक्त या स्वतंत्र पदाची निर्मिती करणे.

१४. स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती करणे.

१५. विशेष न्यायालय स्थापन करणे.

१६. जनसंपर्क अधिकारी पदाची निर्मिती करणे.

(३) दै.लोकमत मध्ये उपस्थित मुद्द्यांच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणा-या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत तसेच लेंटीन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत नियतकालिक अहवाल मागविण्यात आलेला आहे. प्रशासनातील नवीन पदनिर्मिती, सोयीसुविधा, स्पर्धा परिक्षेद्वारा पदभरती तसेच स्वतंत्र दक्षता विभाग, विधी अधिका-यांचे स्वतंत्र पॅनेल, विशेष न्यायालय स्थापन करणे. कार्यालयांचे विक्रेंद्रीकरण, स्वयंपूर्ण प्रशिक्षण संस्था स्थापन करणे, राज्यातील सर्व प्रयोगशाळा एकाच अंमलाखाली आणणे व गुप्त खब-यांना दयावयाच्या मोबदल्याबाबत प्रशासनाकडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांवर संबंधित प्रशासकीय विभागांच्या सल्ल्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच प्रशासनाच्या मुख्यालय व विभागीय कार्यालयांसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्मितीच प्रस्ताव गृह विभागास सादर करण्यात आलेला आहे.

(४) लागू नाही.

---

**येवला शहरातील व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२२) ५९५१ (०७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरातील सि.स.नं.३८०७ / ३८०८ आणि ३९०७ / ३९०८ मधील ९९ व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी येवला नगरपरिषदेने दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ रोजी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनामार्फत सदर प्रस्ताव मंजुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध झालेल्या एकूण १६६ गाळ्यांचे प्रचलित पध्दती नुसार जिल्हाधिकारी नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समिती मार्फत लिलावाने वितरण करणे बाबत जिल्हाधिकारी नाशिक यांना शासनपत्र क्रमांक एमयुएस२०१४/प्र.क्र.७८/नवि-१७ दिनांक १३ मे, २०१५ अन्वये कळविण्यता आलेले आहे.

---

**राज्यात पंचायत समिती स्तरावर तालुका समाजकल्याण अधिकारी पद निर्माण करण्याबाबत**

**(२३) ५९६५ (०९-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात पंचायत समिती स्तरावर तालुका समाजकल्याण अधिकारी पद निर्माण करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०६-२०१५) :**(१) होय.

(२) उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरोग्य सेवा संचालनालय स्तरावर खरेदी केलेल्या औषधी किट खरेदीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबतच्या चौकशी**

**(२४) ५९९२ (०७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य सेवा संचालनालय स्तरावर औषधी किट खरेदीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबतच्या चौकशीसाठी नेमलेल्या म्हैसकर समितीने शासनास अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी अहवालातील तपशील काय तसेच सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीहि कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :**(१) होय, खरे आहे.

(२) औषधी किट खरेदीमध्ये वित्तीय/प्रशासकीय/तांत्रिक अनियमितता झाल्याचा चौकशी समितीचा निष्कर्ष असून सदर निष्कर्षाच्या आधारे संबंधितांविरुध्द दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील काझीगढी दर पावसाळ्यात कोसळत असल्याबाबत**

**(२५) ५९९४ (०८-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील काझीगढी दर पावसाळ्यात कोसळत असल्यामुळे आगामी पावसाळ्यात येणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये सदर गढी कोसळून दुर्घटना टाळण्यासाठी या गढीला संरक्षण भिंत बांधण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने सदरचे कामासाठी शासनाकडून निधी दिला जावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर कामाच्या अनुषंगाने उक्त जागेचे सर्वेक्षण करणे, आर.सी.सी. संकल्पनासाठी तांत्रिक सल्लागार नेमणे इत्यादी कामांसाठी नाशिक महानगरपालिकेने रुपये १६.२५ लक्ष इतका निधी जलसंपदा विभागास दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी उपलब्ध करुन दिला आहे.

याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संरक्षण भिंत बांधण्यासाठी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(२६) ५९९६ (०७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तयार करुन सदर गावांना विविध नागरी सुविधा देण्याचा शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१० रोजी निर्णय घेतलेला असूनही नाशिकसह बहुतांश जिल्ह्यामध्ये अद्यापही सदर निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमध्ये सन २०११ च्या जनगणनेनुसार ५००० लोकसंख्येच्या गावांचा समोवश करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तातडीने तयार करुन तेथे नागरिक सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच प्रश्न भाग (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

राज्यात आतापर्यंत ३११ ग्रामपंचायतीचे पर्यावरण विकास आराखडे तयार करणेबाबतचे निर्देश संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निर्गमित केलेले आहेत. त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील ३० ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

(२) होय.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) सदर योजना पुर्नरचित करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. त्यावेळी ही बाब विचारात घेण्यात येईल.

---

**नाशिक जिल्ह्यातील आधारश्रमातील एस.ए.ए.च्या दोन्ही युनिटच्या सन २००९ पासून प्रलंबित असलेल्या अनुदानाबाबत**

**(२७) ५९९९ (०८-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील आधारश्रमातील दिनांक ३० जानेवारी, २०१४ रोजी एस.ए.ए.च्या दोन्ही युनिटच्या सन २००९ पासून प्रलंबित असलेल्या अनुदानाबाबत मा.मंत्री, महिला व बालविकास यांनी एकात्मिक बाल संरक्षण योजना पुणे यांना केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देवूनही आय.सी.पी. एस ने माहे जानेवारी, २०१५ पर्यंत केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) होय,

आधाराश्रम नाशिक या संस्थेच्या एका युनिटसाठी एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत अनुदान दिले एकात्मिक बाल संरक्षण अनुदान दिले जाते. तथापि, सदर संस्थेच्या दुस-या युनिटच्या अनुदानासाठीच्या सन २०१३-१४ मध्ये केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉरच्या विद्यमान टप्प्यातून नाशिकाला वगळाण्यातआल्या बाबत**

**(२८) ६००५ (०९-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मध्ये मुबलक पाणी उपलबध नसल्याने दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉरच्या विद्यमान टप्प्यातून नाशिकला वगळाण्यात आल्याची माहिती दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डीएमआयसी प्रकल्पांतर्गत येणा-या उद्योगांकरिता नाशिकमध्ये पुरेसे पाणी उपलबध नसल्याचा जलसंपदा विभागाने अहवाल दिल्यानंतर मराठवाड्यातील शेंद्रा आणि बिडकीन निवड डिएमआयसीच्या विद्यमान टप्प्यात केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्हयात २३ लहानमोठी धरणे असल्याने त्यातून नाशिकसह अंशतः मुंबई व मराठवाड्यालाही पाणीपुरवठा होतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डीएमआयसीच्या विद्यमान टप्प्यामध्ये नाशिकचा समावेश करण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :**(१) दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर या प्रकल्पातंर्गत इगतपुरी नाशिक, सिन्नर या औद्योगिक क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतू, सदर प्रकल्पासाठी पाणी व तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे सदर प्रकल्पासंबंधीची कार्यवाही तुर्त स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात शेंद्रा बिडकीन या औद्योगिक क्षेत्राचा पूर्वीच समावेश करण्यात आला होता.

(३) नाशिक जिल्हयातील धरणातून नाशिकसह मराठवाडयाला पाणी पुरवठा करण्यात येतो.

(४) दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर या प्रकल्पात इगतपुरी नाशिक, सिन्नर या औद्योगिक क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, तांत्रिक अडचणीमुळे सदर प्रकल्प तुर्त स्थगित ठेवण्यात आला आहे. तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

---

**नाशिक जिल्ह्यासह राज्यातील शेतकऱ्यांकरिता जास्तीत जास्त लक्षांक व अनुदान उपलब्ध करण्याबाबत**

**(२९) ६०१७ (०८-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाअंतर्गत शेततळे योजनेमध्ये नाशिक जिल्ह्याला निरंक लक्षांक दिल्यामुळे या जिल्ह्याचा सदर योजनेत समावेश करण्यासाठी जिल्हा परिषद कृषी समिती सभेमध्ये दि. ३० ऑक्टोंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास ठराव करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,ख

(२) तसेच शेतकरी बांधवांना सततच्या दुष्काळाचा सामना करून शेतीचे आव्हाण पेलण्यासाठी शासनाने नाशिक जिल्ह्यासह राज्यातील शेतकऱ्यांकरिता जास्तीत जास्त लक्षांक व अनुदान उपलब्ध करण्याची लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०६-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) सन २०१४-१५ मध्ये नाशिक जिल्ह्यात एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत २२५ सामूहिक शेततळ्यांसाठी रु.५५७.०८ लाख व राष्ट्रय कृषि विकास योजनेतंर्गत ७५ सामुहिक शेततळ्यांसाठी रु.१७६.३४ लाख असे एकूण ३०० सामुहिक शेततळ्यांसाठी रु.७३३.४२ लाख अदा करण्यात आलेले आहेत.

सन २०१४-१५ मध्ये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत जिल्ह्यास दिलेलया एकूण वार्षिक कृति आराखड्यांच्या मर्यादेत जिल्ह्यांच्या गरजे प्रमाणे सुधारीत वार्षिक कृती आराखडा तयार करुन, महाराष्ट्र मंजूरी घेऊन, अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. यानुसार जिल्ह्यांना मंजुर वार्षिक कृति आराखड्याच्या मर्यादेत गरजेप्रमाणे सामुहिक शेततळे या घटकाचे लक्षांक व अनुदान बदल करण्यास मान्यता दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील मोहोळ तालुक्यात अंकोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नागरिकांना औषधोपचार व इतर सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(३०) ६०५६ (०६-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील मोहोळ तालुक्यात अंकोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नागरिकांना औषधोपचार व इतर सुविधा मिळत नाहीत तसेच तेथील वैद्यकीय अधिकारी वेळवेर रुग्णालयात येत नाहीत, रुग्णालयात सर्वत्र अस्वच्छतेचे वातावरण असून या आरोग्य केंद्रातील परिसरात मोकाट जनावरांचा वापर असल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी तेथील लोकप्रतिनिधींनी रुग्णालयाला भेट दिली असतां निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले, तेथील रुग्णांना योग्य ते उपचार देण्याबाबत व औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच इतर सुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :**(१) प्राथमिक आरोग्य केंद्र अकोली ता.मोहोळ येथील नागरिकांना औषधोपचार व इतर सुविधा मिळत नाहीत तसेच वैद्यकीय अधिकारी रुग्णालयात येत नाहीत हे खरे नाही. परंतु केंद्राच्या परिसरात अस्वच्छतेचे वातावरण व मोकाट जनावरांचा वावर आहे हे खरे आहे.

(२) होय.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेसा औषधासाठा उपलब्ध असून वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित काम करण्याच्या बाबत व परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. स्थानिक नागरिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्राची संरक्षणभिंत दोन ठिकाणी फोडलेली आहे व त्यामधून जनावरे व लोकांची वहिवाट होत होती याबाबत सरपंच, ग्रामपंचायत यांचेकडे तक्रार करण्यात आली आहे.

---

**मोहोळ शहर व तालुक्यातील डॉल्बी व लाऊड स्पीकर चालकांविरूध्द कारवाई करण्याबाबत**

**(३१) ६०६२ (०६-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ शहरात व तालुक्यात रात्री दहानंतर लाऊड स्पीकर लावून तसेच डॉल्बी या कर्णकर्कश आवाजावर बंदी असतानासुध्दा शहरात सर्रासपणे डॉल्बी व लाऊड स्पीकरचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आवाजामुळे रूग्णांना व ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असून मिरवणुकीमुळे वाहतुक देखील ठप्प होते, डॉल्बी चालक व लाऊड स्पीकर चालकांविरूध्द कारवाई करण्याची पोलीस ठाण्यात तक्रार केली असता याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉल्बी चालक व लाऊड स्पीकर चालकांविरूध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) आवाजामुहे रुग्णांना व ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असलेबाबत, मिरवणूकीमुळे वाहतूक ठप्प झाले बाबत मोहोळ पोलीस ठाणे अथवा उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सोलापूर विभाग यांचेकडे तोंडी अथवा लेखी तक्रार प्राप्त नाही. परंतु डॉल्बी चालक व लाऊडस्पीकर चालकाविरुध्द कारवाई करणेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास तात्काळ प्रचलित कायद्यानुसार योग्य ती कारवाई करणेबाबत सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सन २०१४-१५ या वर्षात जलसंधारणाची कामे मंजूर झाली असून सदर मंजूर कामांना माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर निधी मिळाला नाही**

**(३२) ६१२५ (०६-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत):** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१४-१५ या वर्षात जलसंधारणाची किती कामे मंजूर झाली असून सदर मंजूर कामांना माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर निधी मिळाला नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास त्यामध्ये कोणकोणत्या जलसंधारणाची जिल्हानिहाय कामे प्रलंबित आहेत,
(३) सदर प्रलंबित कामाना निधी मंजूर करुन जलसंधारणाची प्रकरणे निकाली काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) होय.

सन २०१४-१५ या वर्षात आतापर्यंत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत १२०० योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून त्यांची किंमत रु.९६५.२४ कोटी आहे. सदर योजना प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ रोजीचे पत्रान्वये सदर योजनांना स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे सदर योजनांसाठी निधीची मागणी करण्यात आलेली नाही.

(२) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळातर्फे सन २०१४-१५ या वर्षात ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या एकूण १२१९ योजनांपैकी १९ योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नसल्यामुळे प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आल्या. उर्वरित १२०० योजनांची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | योजनांची संख्या | जिल्हा | योजनांची संख्या |
|---|---|---|---|
| रायगड | २ | जळगांव | १० |
| रत्नागिरी | ९ | नाशिक | ७ |
| सिंधुदुर्ग | १० | परभणी | ८५ |
| ठाणे | १ | लातूर | ११ |
| सोलापुर | ९ | औरंगाबाद | ६४५ |
| सातारा | २३ | जालना | १५१ |
| धुळे | १ | बीड | २०८ |
| अहमदनगर | २० | नांदेड | ८ |

(३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळातर्गत स्थगिती देण्यात आलेल्या सर्व योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासून योजना तांत्रिकदृष्टया योग्य/अयोग्य असल्याबाबत, जलसंधारण विभागाच्या नियंत्रणाखालील पुणे व नागपूर येथे कार्यरत दोन मुख्य अभियंते तसेच जलसंपदा विभागाचा एक मुख्य अभियंता यांची समिती गठित करण्यात आली असून समितीच्या अहवालानुसार महामंडळ स्तरावर पुढील उचित निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील कृष्णा खोरे या दुष्काळी भागातील जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेच्या कामाची प्रगतीबाबत**

**(३३) ६१४७ (०७-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कृष्णा खोरे या दुष्काळी भागातील जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेच्या कामाची प्रगती व सद्यःस्थिती काय आहे,

(२) तसेच, या कामात आतापर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे,

(३) तसेच, या योजनेच्या कामास सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षी किती तरतूद करण्यात आली व प्रत्यक्षात किती निधी देण्यात आला,

(४) असल्यास, या तिन्ही वर्षात या योजनेसाठी काहीच तरतूद केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(५) तसेच, या योजनेच्या कामासाठी किती निधीची आवश्यकता आहे व तो केव्हापर्यंत देण्यात येईल ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५)** :(१) बॅरेजचे काम ४५ टक्के पूर्ण, पंपगृह क्र. १ चे ३० टक्के काम पूर्ण, पंपगृह क्र. २ व ३ चे ९५ टक्के काम पूर्ण असून ऊर्ध्वगामी नजीकेच्या एका रांगेचे काम ६० टक्के पूर्ण आहे. वर्धनगड बोगदा ९८ टक्के व आंधळी बोगदा ७५काम पूर्ण आहे. येरळा नदीवरील एकूण १५ पैकी १५ व माण नदीवरील एकुण १७ पैकी १६ को.प. बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी सदर प्रकल्पाचे काम बंद आहे.

(२) योजनेची प्रशासकीय मान्यताप्राप्त किंमत रु. २६९.०७ कोटी इतकी असून फेब्रुवारी २०१५ अखेर रु. २९५.२७ कोटी खर्च झालेला आहे.

(३)

| सन | तरतुद | वितरीत |
|---|---|---|
| २०१२-१३ | ५० कोटी | ४०.०० कोटी |
| २०१३-१४ | १३५ कोटी | ८७.३३ कोटी |
| २०१४-१५ | १०४ कोटी | ६२.४० कोटी |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) सन २०१०-११ च्या दरसुचीनुसार प्रकल्पाची उर्वरित किंमत रु. ६८४.८० कोटी इतकी अपेक्षित होती. तथापि, योजनेचा प्रचलित दरसुचीवर आधारित असलेला सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात येत आहे. त्यास मान्यता दिल्यावर मा.राज्यपाल यांच्या निदेशानुसार निधी उपलब्ध करण्यात येईल.

---

### सागरी अधिनियम कायद्यानुसार १० जून ते १५ ऑगस्ट किंवा नारळी पौर्णिमेपर्यंतच्या कालावधीत यांत्रिक बोटींनी समुद्रात मासेमारी करण्यात बंदी घातल्याबाबत

**(३४) ६१६६ (०४-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरी अधिनियम कायद्यानुसार १० जून ते १५ ऑगस्ट किंवा नारळी पौर्णिमेपर्यंतच्या कालावधीत यांत्रिक बोटींनी समुद्रात मासेमारी करण्यात बंदी आली असताना नियमाचे उल्लघन करुन, मासेमारी करण्यात येते, परिणामी प्रजननक्षम माशांचा नाश होतो ही बाब मत्स्यदुष्काळाला कारणीभूत ठरते, हे खरे आहे काय

(२) असल्यास, बड्या मच्छिमारांचे हित जोपासण्यासाठी मासेमारीचा बंदी काळ शासनाने १५ दिवसांनी कामी केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बंदीकाळ पूर्ववत करण्याबाबत आणि बंदीकाळात यांत्रिक बोटीने मासेमारी करणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :**(१) नाही.

(२) नाही. केंद्र शासनाच्या दि. १० एप्रिल, २०१५ च्या आदेशान्वये दि. १ जून ते ३१ जुलै असा बंदी कालावधी घोषित केला आहे.

(३) बंदीकाळ पुर्ववत करण्याबाबत प्रश्न उध्दवत नाही. महाराष्ट्र सागरी सामेमारी नियमन अधिनियम १९८१ च्या कायद्याचे उल्लंघन करणा-यांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

---

**फुणगुस (ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी) जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील फुणगूस येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी यांच्यासाठी असलेल्या स्वतंत्र इमारती जीर्ण झाल्याबाबत**

**(३५) ६१८४ (०६-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील फुणगूस येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र दोन इमारती असून या इमारती ३० वर्षापूर्वी बांधण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारती आता जिर्ण झाल्या असून इमारती कोसळून अपघात होण्याची शक्यता आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती निर्णय घेतला,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यावर निर्णय केव्हा घेण्यात येईल ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०६-२०१५) :**(१) सदर इमारती २७ वर्षापूर्वी बांधण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही. परंतु वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, फुणगुस यांनी अधिकरी कर्मचारी निवास्थान इमारतीची दुरुस्ती आवश्यक आहे असे कळविले होते.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्र, फुणगुस येथील अधिकारी व कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती करीता सन २०१३-१४ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अनुदान मंजुर झाले असून दुरुस्तीचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील नागोठणे येथे बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या ११ बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आल्याबाबत**

**(३६) ६१९४ (०७-०५-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील नागोठणे येथे बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या ११ बांगलादेशी घुसखोरांना जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) कलकत्ता मार्गे मुंबईत येवून मुंबईतील हसन मंडळ या दलालाच्या माध्यमातून ते नागोठणे पर्यत पोहोचले, हे ही खरे आहे काय,

(३) सदर दलालाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली तसेच बांगलादेशीच्या घुसखोरीला पायबंद घालण्यासाठी शासनाने कोणती उपपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये एकूण ११ बांगलादेशी घुसखोरांना व त्यांना मदत करणाऱ्या २ व्यक्तींना अशा एकूण १३ व्यक्तींना दिनांक १.१.२०१५ रोजी अटक करण्यात आले आहे.

(३) ११ घूसखोर बांगलादेशी नागरिक, त्यांना मदत करणारा दलाल हसन तबल मंडळ व राजेंद्र बाबूराव धात्रक यांचेविरुध्द नागोठणे पोलीस ठाणे येथे ॥ कॉ.गु.र.नं.०१/२०१५ विदेशी नागरिक अधिनियम, १९४६ चे कलम १४(क), r/w १७६(२), ३४ भा.दं.वि.सं.प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

बांग्लादेशी घुसखोरीला पायबंद घालण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्र बांग्लादेशी विरोधी पथक स्थापन करण्यात आले असून या पथकाद्वारे रायगड जिल्ह्यात बेकायदा घुसखोरी करणाऱ्या बांग्लादेशी इसमांचा शोध घेऊन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येते. बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या बांग्लादेशींवर कारवाई करुन मा. न्यायालयाच्या आदेशांन्वये पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अदिवासी भागातील कुपोषण बालकांना योग्य ते उपचार देण्याबाबत**

**(३७) ६१९९ (१०-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अदिवासी भागात २० टक्के बालके कुपोषित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे, नंदुरबार व अमरावती या जिल्ह्यातील आदिवासी पट्टयांमध्ये हे प्रमाण ४० टक्क्यांवर पोहोचले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी कुटुंबासाठीच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविणे व कुषोषणग्रस्त बालकांना योग्य ते उपचार देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०७-२०१५) :**(१) व (२) आदिवासी भागामध्ये सन २०१४-१५ मधील बालकांची एकूण संख्या ३३७७८३४ बालके असून त्यापैकी सर्वसाधारण श्रेणीतील बालके ५७११३३ आहेत. तसेच मॅम श्रेणीतील (मध्यम तीव्र कुपोषित) २५६९८ व सॅम श्रेणीतील (अति तीव्र श्रेणीतील) ९११८ बालके आहेत. हे प्रमाण सर्वसाधारण १७.९३ % आहे.

ठाणे जिल्हयातील आदिवासी कार्यक्षेत्रामध्ये फेब्रुवारी, २०१५ मध्ये १४४५९३ बालकांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी मॅम श्रेणीतील बालके १०९९३ व सॅम श्रेणीतील बालके १९९९ असून हे प्रमाण ८% आहे.

अमरावती जिल्हयातील मेळघाट भागात एकूण ३१५१९ बालकांपैकी मॅम श्रेणीतील बालके ९०३१ असून सॅम श्रेणीतील बालके २५०६ आहेत. हे प्रमाण ३६.६० % आहे.

नंदुरबार जिल्हयातील आदिवासी भागामध्ये मार्च, २०१५ मध्ये एकूण १७०१९४ बालकांपैकी मॅम श्रेणीतील ३६३५९ बालके व सॅम श्रेणीतील ५८६९ बालके आहेत. हे प्रमाण २८.९८ % आहे.
(३) शासनाद्वारे राज्यामध्ये बालमृत्युंचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध आरोग्य विषयक योजना राबविण्यात येतात.

अंगणवाडी कार्यक्षेत्रातील सर्व बालकांना तसेच गरोदर व स्तनदा मातांना पुरक पोषण आहार दिला जातो. अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्रे, १५ आदिवासी जिल्हयांमध्ये पोषण पुनर्वसन केंद्रे, ३६ ठिकाणी आजारी नवजात बालकांसाठी विशेष काळजी कक्ष (एसएनसीयु), बालमृत्यु अन्वेषण, जंतनाशक व जीवनसत्व-अ मोहीम, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम इ. विविध योजना राबविल्या जातात. तसेच नवसंजीवन योजने अंतर्गत खावटी कर्ज योजना राबविण्यात येते. तसेच ग्रेड ३ व ४ मधील सर्व बालकांना आंतररुग्ण सेवा व तातडीचे औषधोपचार देण्यात येतात. कलापथक, पोस्टर्स, बॅनर्स यांच्या माध्यमातून संस्थेमध्ये प्रसूति करणे, कुपोषण व आहाराबाबत जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील कुळेवाशी येथील गडगडी पाटबंधारे प्रकल्पाचे काम गेल्या ३० वर्षापासून अपूर्ण असल्याबाबत**

**(३८) ६२०० (०७-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील कुळेवाशी येथील गडगडी पाटबंधारे प्रकल्पाचे काम गेल्या ३० वर्षापासून अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काम अपूर्ण असल्यामुळे प्रकल्पाचे दोन्ही कालवे मातीने भरून गेल्यामुळे पाण्याअभावी शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व या पाटबंधारेचे काम पूर्ण करण्याबाबत तसेच कालव्यातील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१५) :**(१) होय,
(२) अंशत: खरे आहे. कालवा कामांना १९८७-८८ मध्ये सुरुवात झाली. कालव्यामध्ये कोकणातील अतिवृष्टीमुळे गाळ येऊन साठला व झाडेझुडपे वाढली आहेत. त्यामुळे शेतक-यांना शेतीसाठी पाणी देता आले नाही.
(३) नाही.
(४) कालव्यातील गाळ व झाडे झुडपे यांत्रिकी विभागाच्या सहाय्याने काढण्यात येत आहेत. या हंगामात कालव्यात पाणी सोडण्यात आले आहे.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील ६० आरोग्य उपकेंद्रापैकी ४७ उपकेंद्र भाड्याच्या जागेत असल्याबाबत**

**(३९) ६२०६ (०४-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील ६० आरोग्य उपकेंद्रापैकी ४७ उपकेंद्र भाड्याच्या जागेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच भाड्याच्या जागेमुळे आरोग्य कर्मचारी त्याठिकाणी वास्तव्य करु शकत नाही, परिणामी नियमित वैद्यकीय सेवेपासून ग्रामीण रुग्ण वंचित राहते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्वतःच्या जागेत ४७ आरोग्य उपकेंद्रे उभारण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही. रत्नागिरी जिल्हयात ३७८ उपकेंद्रे असून ११४ उपकेंद्रे भाडयाच्या जागेत कार्यरत आहेत.
(२) आरोग्य उपकेंद्राना मोफत बक्षिस पात्र जागा उपलब्ध नसल्याने भाडयाच्या जागेमध्ये कार्यरत आहेत.
(३) हे खरे नाही. जागेअभावी आरोग्य उपकेंद्राचे कामकाज भाडयाच्या व ग्राम पंचायतींच्या जागेत सुरु आहे. आरोग्य कर्मचारी यांना घरोघरी भेट देणे सक्तीचे असल्याने ग्रामीण भागातील रुग्ण आरोग्य सेवेपासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घेतली जाते.
(४) आरोग्य उपकेंद्रांसाठी जागा उपलब्ध नसलेल्या ठिकाणी त्याच कार्यक्षेत्रातील इतर गावात उपकेंद्र स्थलांतर करण्याबाबत संबंधित सरपंच, तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच स्थानिक वर्तमान पत्राद्वारे प्रसिध्दी देण्यात आली आहे.

---

**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत रत्नागिरी**
**जिल्हयातील पाच तालुक्यांची निवड केल्याबाबत**

**(४०) ६२०७ (०८-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत रत्नागिरी जिल्हयातील पाच तालुक्यांची निवड केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच वर्षांत या तालुक्यांसाठी २२८.३४ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला होता, त्यापैकी केवळ ४१.८२ कोटी रूपये खर्च झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या हिताच्या कार्यक्रमावर अत्यल्प निधी खर्च करण्याची कारणे काय आहेत,

(४) उर्वरित निधीचा पूर्णक्षमतेने वापर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) :**(१) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सन २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीत रत्नागिरी जिल्हयातील एकूण आठ तालुक्यांची टप्याटप्याने निवड करण्यात आलेली आहे.

(२) रत्नागिरी जिल्हयातील एकूण आठ तालुक्यांसाठी रु. २७४०५.५३ लाख इतक्या रकमेचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यापैकी प्राप्त निधी रक्कम रु. ५६८०.५५ लाख एवढा असून रक्कम रु. ५२५५.६२ लाख रुपये खर्च झालेला आहे.

(३) प्राप्त निधी रक्कम रु. ५६८०.५५ लाख एवढा असून रक्कम रु. ५२५५.६२लाख रुपये खर्च झालेला आहे.

(४) बॅच १ ते ३ मधील प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प आराखडे मंजूर असून उर्वरित प्रकल्पांचे आराखडे तयार करण्यात येत आहेत. प्राप्त निधीपैकी ९३ टक्के खर्च करण्यात येत आहेत. प्राप्त निधीपैकी ९३ टक्के खर्च करण्यात आलेला आहे. उर्वरित निधी प्राप्त होताच नियोजनाप्रमाणे पूर्ण क्षमतेने निधी वापर करण्याचे प्रयोजन आहे.

---

**इंदिरा आवास व रमाई योजनाबाबत**

**(४१) ६२१३ (०८-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक व दुर्बल दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांला हक्काचे घर मिळावे म्हणून राज्य शासनाने इंदिरा आवास व रमाई योजना सुरु केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील ६ हजार १९१ घरकुलांचे प्रस्ताव रखडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बेघर लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) होय.
(२) नाही. सन २००२ च्या आर्थिक व जात सर्वेक्षणानुसार सन २००८-०९ मध्ये तयार करण्यात आलेली इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांची कायम प्रतिक्षा यादी संपुष्टात आली आहे. या प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या ८६६६ घरकुल पात्र लाभार्थ्यांच्या सुधारित प्रतिक्षा यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. यापैकी २२०७ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला. २६८ लाभार्थ्यांनी स्वखर्चाने घरे बांधली असून उर्वरित ६१९१ लाभार्थ्यांना आगामी वर्षात घरकुलाचा लाभ देणे बाकी आहे.
(३) इंदिरा आवास योजनेसंदर्भात केंद्र शासनाची मार्गदर्शक तत्वे व घरकुलाचा लाभ देण्यासंदर्भात असलेल्या धोरणानुसार लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात येईल.

---

## ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या केंद्रावर बारदाने नसल्याने भात खरेदी पूर्णपूणे बंद झाल्याबाबत

**(४२) ६२३१ (०९-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळाच्या शहापूर (जि.ठाणे) मुरबाड, कर्जत तालुक्यातील शहापूर, डोळखांब, टेंभा, किन्हवली, भंडारा तसेच मुरबाड तालुक्यातील माळघसई व कर्जत तालुक्यातील कशेळे, पाथरज, या केंद्रावरील बारदान उपलब्ध नसल्यामुळे माहे डिसेंबर २०१४ पासून भात खरेदी बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संर्दभात, तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी महामंडाळाच्या शहापूर येथील कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व त्यानुसार भात खरेदी बंद करुन खाजगी व्यापा-यांना सहकार्य करणा-या महामंडळाच्या अधिका-यांवर कोणेती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच शेतकऱ्यांना भेडसावणारी समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१५) :**(१) व (२) माहे डिसेंबर, २०१४ मध्ये ठाणे जिल्हयातील शहापूर व मुरबाड तालुक्यातील खरेदी केद्रांना अनुक्रमे १४,००० व १६,००० नग तसेच रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यातील खरेदी केंद्रांना ७,००० नग बारदानाचा पुरवठा करण्यात आलेला होता. तरी देखील जानेवारी,२०१५ च्या पहिल्या आठवडयात बारदाना अपुरा पडल्याने शहापूर व मुरबाड तालुक्यात एक आठवडा धान खरेदी बंद होती. त्यामुळे दि. १२/१/२०१५ रोजी

स्थानिक मा. विधानसभा सदस्य यांच्या नेतृत्वाखाली शहापूर उप प्रादेशिक कार्यालयावर मोर्चा काढून उप प्रादेशिक व्यवस्थपक, शहापूर यांना डांबून ठेवण्यात आले होते. उप प्रादेशिक व्यवस्थापकांनी दिलेल्या सुचनेनुसार माहे जानेवारी, २०१५ मध्ये सर्व खरेदी केंद्रांवर बारदानांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(३) शहापूर, मुरबाड व कर्जत येथील खरेदी केंद्रांवर नोव्हेंबर, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत १,५६,००० नग नवीन बारदाना पुरवठा करण्यात आला असल्याने खाजगी व्यापाऱ्यांना सहकार्य करण्याबाबत महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(४) आवश्यकतेनुसार बारदाना उपलब्ध करुन देण्याबाबत पुरवठादारास सूचित करण्यात आले आहे.

---

## धुळे तालुक्यातील पुरमेपाडा येथील धरणात मोसम नदीचे वाहून जाणारे अतिरिक्त पाणी टाकून डावा कालवा काढण्याबाबत

**(४३) ६२३२ (०६-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील पुरमेपाडा येथील धरणात मोसम नदीचे वाहून जाणारे अतिरिक्त पाणी टाकून डावा कालवा काढावा अशी मागणी मा.महसूल मंत्री यांचेकडे आर्वी येथील बोरी खोरे विकास संघर्ष समितीमार्फत माहे जानेवारी, २०१५ च्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५)** :(१) होय.

(२) उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रत्यक्षात डावा वाढीव कालव्यासाठी किती पाणी उपलब्ध होऊ शकेल याबाबतचा अभ्यास क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

पाणी उपलब्धततेची निश्चिती झाल्यावर आर्थिक व्यवहार्यता तपासुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहोळ तालुक्यातील (जि.सोलापूर) मार्ग क्रमांक १४९ मोहोळ-कुरुल कामती मंदूप एकूण ४९ कि.मी. या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(४४) ६२४९ (१०-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ तालुक्यातील (जि.सोलापूर) मार्ग क्रमांक १४९ मोहोळ-कुरुल कामती मंदूप एकूण ४९ कि.मी. या रस्त्याच्या कामाचे चौपदरीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मंजूर निविदेमध्ये रस्त्याच्या एका बाजुने काम करण्यास वाव असुन त्यामुळे रस्त्याच्या एकाच बाजुच्या शेतकऱ्यांची जमीन संपादीत करावी लागणार असल्याने संबंधीत शेतकरी, नागरीक व लोकप्रतीनिधिंच्या विरोधामुळे काम होऊ शकले नाही. यास्तव रस्त्याच्या दोन्ही बाजुस रुंदीकरणाचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहोळ मतदार संघातील तिन्ही तालुक्यात सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची कामे बंद असल्याबाबत**

**(४५) ६२५० (०७-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ मतदार संघातील तिन्ही तालुक्यात सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सामाजिक वनीकरणाची तसेच पाणंद रस्ते गावातील अंतर्गत रस्ते तसेच नवीन विहीरींची कामे संपूर्णपणे बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व कामे बंद राहण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, मजुरांना रोजगार मिळावा यासाठी रोजगार हमीची कामे पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) मोहोळ मतदार संघातील तिन्ही तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्ते गावातील अंतर्गत रस्ते तसेच नविन विहिरींची कामे बंद आहेत. तथापि सामाजिक वनीकरणाची कामे सुरु आहेत.

(२) मोहोळ तालुक्यात एकूण ९५ ग्रामपंचायती असुन मोहोळ मतदारसंघातील तिन्ही तालुक्यात सद्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते तसेच नविन विहिरींची कामे इत्यादीबाबत मजूरांकडून कामाची मागणी न आल्यामुळे बंद आहेत.

तथापि लागवड अधिकारी मोहोळ यांचेमार्फत एकूण १७ कामे रोपवाटीका, रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड, गट लागवड, विखुरलेल्या स्वरुपात वृक्ष लागवड ही कामे सुरु आहेत. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी मोहोळ यांचेमार्फत १ काम सुरु असुन सहाय्यक अभियंता श्रेणी १ सार्वजनिक बाधकाम विभाग मोहोळ मार्फत १ जोडरस्त्याचे काम सुरु आहे. तसेच पंढरपूर तालुक्यात सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, पंढरपूर मार्फत १४ वृक्षलागवडीची कामे सुरु आहेत.

(३) मजुरांना रोजगार मिळावा यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मोहोळ मतदार संघातील उत्तर सोलापूर तालुक्यात विहीर पुनर्भरणाची कामे सुरु आहेत. तसेच ११९ विहिर पुनर्भरण कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत विविध कामासाठी केलेल्या कृती आराखड्यानुसार मजूरांची मागणी प्राप्त होताच मागणीनुसार कामे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## पुणे जिल्हयातील गौण खनिज विकास निधीचे मागील चार वर्षापासून वितरण झाले नसल्याबाबत

**(४६) ६२७१ (०४-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील गौण खनिज विकास निधीचे मागील चार वर्षापासून वितरण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्या, पुणे जिल्हयातील गौण खनिज उत्खननांतून शासनाला कोटयवधी रूपयांचा महसूल मिळत असताना रस्त्यांची मात्र गौण खनिजांच्या वाहतुकीने दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वि.स.स.शिरूर यांनी दिनांक २१ नाव्हेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे गौण खनिज विकास निधी २०१४-१५ मधून कामे हाती घेण्याची मागणी करूनही कुठलीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-०७-२०१५) :**(१) नाही. खनिज विकास निधीच्या वापर व वाटपासंदर्भात सुधारित मार्गदर्शक तत्वे दिनांक ०१.०८.२०१२ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहेत. या शासन निर्णयातील सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार प्राप्त झालेल्या पुणे जिल्ह्यातील रुपये ११३८.५७ लक्ष अंदाजित खर्चाच्या ५२ कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(२) पुणे जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये वाळू वाहतूक करतांना काही रस्ते थोड्याफार प्रमाणात बाधित झालेले आहेत.

(३) विधान सभा सदस्स शिरुन यांनी दिनांक २१.११२०१४ च्या पत्रान्वये प्रस्तावित केलेल्या कामांची अंदाजपत्रके आवश्यक तांत्रिक मान्यतेसह सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना दिनांक २२.०६.२०१५ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

(४) व (५) सदर कामांचे प्रस्ताव अद्याप कार्यान्वयन यंत्रणेकडूण जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे प्राप्त झालेले नाहीत.

---

## कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या दारिद्र्य रेषेखालील कुटूंबासाठी सुरु केलेली सावित्रीबाई कल्याण योजना

**(४७) ६२७८ (०६-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १ किंवा २ मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या दारिद्र रेषेखालील कुटुंबासाठी शासनाने २००१ मध्ये सावित्रीबाई कन्या कल्याण योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १४ वर्षामध्ये पुणे जिल्ह्यातील १०६ व्यक्तींनी योजनेचा लाभ घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थी दारिद्रय रेषेखालील असावा असा निकष असल्याने अनेक महिलांना या योजनेपासून वंचित राहावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेतील बक्षीस वाढविण्याबाबत व दारिद्रय रेषेची अट वगळून गरीब लाभार्थ्याला या योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनस्तरावरुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) अशंत: खरे आहे.

सन २००१ ते २०१४ या कालावधीत पुणे जिल्हयातील एकुण १८५ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

(३) लाभार्थी दारिद्रय रेषेखालील असावा अशी अट शासन निर्णयात आहे. परंतु या निकषामुळे अनेक महिलांना या योजनेपासून वंचित रहावे लागले अशी बाब आढळुन आलेली नाही.

(४) सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेतील दारिद्रय रेषेची (बी.पी.एल.) अट रद्द करुन उत्पन्नाचे दाखल्याचे आधारे योजनेचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील तहसील कार्यालयातील ध्वजारोहन करण्याचा मान लोकप्रतिनिधींना मिळण्याबाबत**

**(४८) ६२७९ (०६-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.शंभुराज देसाई (पाटण), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तहसील कार्यालयातील राष्ट्रीय सणांना होणाऱ्या ध्वजारोहणाचा मान लोकप्रतिनिधींना मिळावा अशी मागणी विरोधी पक्षनेत्यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्यमंत्री, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपंचायतीसह ग्रामपंचायतीच्या सरपंच पदापर्यंत सर्व लोकनियुक्त प्रतिनिधिंना ध्वजारोहणाचा हक्क देण्यात आलेला आहे तसेच जिल्हा पातळीवरही पालक मंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींना तालुक्याच्या ठिकाणी ध्वजारोहण करण्याचा मान मिळण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१५)** :(१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र दिनी लोकप्रतिनिधींच्या हस्ते तालुक्याच्या ठिकाणी ध्वजारोहण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबतचे परिपत्रक दिनांक २२.०४.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळेगाव ढमढेरे ता.शिरूर (जि.पुणे) येथील हूतात्मा विष्णू गणेश पिंगळे यांचे स्मारकाची दुरावस्था झाल्याबाबत**

**(४९) ६२८८ (०७-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव ढमढेरे (ता.शिरूर, जि.पुणे) हुतात्मा विष्णू गणेश पिंगळे यांच्या स्मारकाची सध्या दुरावस्था होऊन येथे कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या पिढीला प्रेरणा देणा-या या क्रांतीकारकाच्या स्मारकास सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही. हुतात्मा विष्णु गणेश पिंगळे यांचे स्मारकाची संरक्षण भिंत व सुशोभिकरणाची कामे मा.ना.प्रकाश जावडेकर यांचे निधीतून चालू असून अभ्यासिकेसाठी स्वतंत्र खोलीचे बांधकाम झालेले आहे. सन २०१४-२०१५ या वित्तिय वर्षामध्ये रु.२३,३००/- इतके अर्थसंकल्पिय अनुदान स्मारकाचे देखभाल, वीज भरणा, जयंती/पुण्यतिथी/क्रांतीदिन कार्यक्रम इत्यादी खर्चासाठी तहसीलदार यांचेमार्फत धनादेश गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर यांना अदा करण्यात आलेला आहे.

(२) नव्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी ग्रामपंचायतीने हुतात्मा विष्णु गणेश पिंगळे यांचे स्मारकामध्ये ग्रंथालय सुरु केले असून अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर तालुक्यातील (जि. पुणे) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या रस्त्याबाबत**

**(५०) ६३०३ (०७-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील शिरुर ते जांभळी थाबा, मांडवगण फ़ाटा ते गोकुळ नगर, मांडवगण फ़ाटा ते घाडगे तळे या रस्त्यांचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पुर्ण करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या बांधकामास अद्याप ५ वर्ष पुर्ण झालेली नसताना या रस्त्यावरुन वाहतुक करणे अवघड झाले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत अनेक कामे पुर्ण होऊन ५ वर्षे झालेली नसतांना रस्ते वाहतुकीस योग्य राहिलेली नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कामे करण्यात आलेल्या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासन स्तरावरुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०७-२०१५)** :(१) व (२) हे खरे आहे. शिरुर तालुक्यातील प्रश्नांकित ३ रस्तयांपैकी शिरुर ते जांभळी थापा या रस्त्यास ५ वर्ष पूर्ण झालेली नसुन रस्ता सुस्थितीत आहे.

उर्वरित मांडवगण फाटा ते गोकुळ नगर व मांडवगण फाटा ते घाडगे तळे या दोन रस्त्यांच्या बांधकामास ५ वर्ष पूर्ण झालेली असून, त्यापैकी मांडवगड फाटा ते घाउगे तळे या रस्ता सुस्थितीत आहे.

मांडवगण फाटा ते गोकुळ नगर या रस्त्यास खड्डे पडले आहेत. हा रस्ता सन २०१५-१६ च्या विशेष दुरुस्ती कार्यक्रमामध्ये प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

(३) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील पूर्णत्वानंतर ५ वर्ष कालावधी न झालेले एकूण १० रस्ते आहेत व या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदाराकडून वेळोवेळी करुन घेण्यात आलेली आहे. हे सर्व रस्ते वाहतुकीस योग्य व सुस्थितीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.